# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालय**

**(पोलीस वार्तापत्र)**

**सायंकाळ**

**दिनांक २६.०५.२०२३ शुक्रवार**

## मा.न्यायालयातुन आरोपीस शिक्षा :—

दिनांक २६.०५.२०२३ रोजी मा. अति. सह जिल्हा न्यायाधीश तथा अति. सत्र न्यायाधीश (विशेष पोक्सो कोर्ट), श्री. आर.पी पांडे साहेब, यांनी त्यांचे कोर्टचे स्पेशल केस क्र २६१/२०२१ मधील पो. ठाणे नंदनवन येथील, अप.क्र. १४१/२०२१ कलम ३५४(ड),५०६,३४ भादवि सहकलम १२ पोक्सो कायदा या गुन्हयातील आरोपी १) सिध्दार्थ अनिल पिल्लेवान वय २० वर्ष, रा. नंदनवन २) स्वप्निल उर्फे बंटी किशोर सोनटक्के वय २४ वर्ष रा. नंदनवन याचे विरूध्द साक्षी पुरावाअंती गुन्हा शाबीत झाल्याने दोन्ही आरोपींना **कलम ३५४(ड) भा.दं.वि. मध्ये ६ महिने कारावासाची शिक्षा व १,०००/ रू दंड व दंड न भरल्यास १० दिवस अतिरिक्त कारावासाची शिक्षा तसेच कलम १२ पोक्सो ॲक्ट अन्वये ०६ महिने कारावासाची शिक्षा व १,०००/ रू दंड व दंड न भरल्यास १० दिवस अतिरिक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक. ०९.०३.२०२१ चे २०.३५ वा. ते २०.५५ वा. चे दरम्यान पो.ठाणे नंदनवन हद्दीत राहणारी १५ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी ही आईसोबत औषध आणण्याकरीता हिवरी नगर एस.बी.आय. बॅकेजवळुन जात असतांना यातील वर नमुद आरोपीतांनी संगमत करून मोटार सायकलने फिर्यादीचा पाठलाग करून फिर्यादीस लज्जा येईल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो. ठाणे नंदनवन येथे सदर गुन्हा दाखल करून आरोपीतांना दि.१०.०३.२०२१ चे १४.०६ वा. अटक करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी तात्कालीन, मपोउपनि एस.बी.गौड यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती आसावरी पडसोडकर मॅडम यांनी तर आरोपी तर्फे ॲड एस.एन.नंदेश्वर व ॲड. मनोज मेंढे यांनी काम पाहिले. सदर गुन्हयात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा अरून व प्रमोद येवले यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

## १) पोलीस ठाणे सदर : — प्राणांकीत अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

दिनांक २५.०५.२०२३ चे २३.२० वा. चे सुमारास फिर्यादी कृष्णानंद अवधुत आत्राम वय ४० वर्ष रा. गोंड मोहल्ला भांडेवाडी पारडी नागपुर हे सुरेद्रगड गिट्टीखदान येथील त्यांचे सासुरवाडी येथुन त्यांची पत्नी सौ. योगेश्री कृष्णानंद आत्राम वय ३० वर्ष व मुलगा आलोक वय ११ वर्ष असे त्यांचे जुपीटर गाडी क्र. एम.एच.४९ बी.एल. ९९५७ ने घरी परत जात असतांना सदर उडान पुलावरून छावणीतील एस.बी.आय.बॅक समोरून जात असतांना व फिर्यादीस रस्ता विसल्यासारखे वाटल्याने फिर्यादीने वाहन यु टर्न केले असता त्यांचे वाहनाचे मागुन येणारे पांढऱ्या रंगाचे चारचाकी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनास धडक दिली ज्यामुळे फिर्यादीची पत्नी व मुलगा पुलाचे खाली पडुन गंभीर जख्मी झाले व फिर्यादी हे वाहनासह पुलावर पडुन गंभीर जख्मी झाले जख्मींना उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे नेले असता फिर्यादीची पत्नी सौ. योगेश्री कृष्णानंद आत्राम वय ३० वर्ष व मुलगा आलोक कृष्णानंद आत्राम वय ११ वर्ष यांना डॉक्टरांनी तपासुण मृत घोषीत केले. फिर्यादी यांचा मेयो हॉस्पीटल येथे उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे मसपोनि भारती गुरनुले ७७२१९९४४६४

यांनी आरोपी अज्ञात पांढऱ्या रंगाचे चारचाकी वाहन चालकाविरूध्द कलम ३०४(अ), २७९, ३३८, भा.दं.वी., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेत आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाठोडा :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल</u>**

दिनांक १०.०५.२०२३ चे १२.३० वा. ते दि.१४.०५.२०२३ चे ०३.५० वा. दरम्यान पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत प्लॉट नं ४९, महाकाळकर ले आउट वाठोडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी हरीष घोडकांजी झोडे, वय २८ वर्ष, यांनी पासपोर्ट बनविण्याकरीता ऑनलाईन अर्ज केला होता. यातील आरोपी मो.क्र. ९८२९९७०००८, ८२७४०६२६५४ धारकाने या नंबर वरून फिर्यादीस फोन करून तुमचे पासपोर्ट स्पीड पोस्ट ऑफीस येथे आलेले आहे असे खोटे सांगून फिर्यादीस ॲक्टीवेशन चार्ज ५ /—रू. ऑनलाईन भरण्यास सांगीतले. फिर्यादीने ऑनलाईन ५/— रू. भरले असता फिर्यादीचे बॅकेचे खात्यातुन तीन वेळा असे एकुण १,००,०००/—रू. ऑनलाईन वळते करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि नागरीक ९६०४५८०२०८ यांनी वर नमुद मो.नं. धारक आरोपीविरूद्ध कलम ४२०, भा.दं.वि. सहकलम ६६(सि), ६६(डी) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध घेत आहे.

**<u>३) पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर अंतर्गत दि. २५.०५.२०२३ रोजी मोबाईल चोरीचे एकुण १४ गुन्हे दाखल.</u>**

पोलीस आयुक्तालय नागपुर शहर मधील वेगवेगळ्या पोलीस ठाणे अंतर्गत मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द दि. २५.०५.२०२३ रोजी एकुण १४ गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन, नमुद गुन्ह्यांचा तपास सबंधीत पोलीस ठाण्याचे अधिकारी/अंमलदार हे पारंपारीक तथा तांत्रीक पध्दतीने करीत आहेत.

**( अकस्मात मृत्यु )**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका</u>** : — दिनांक २५.०५.२०२३ चे १७.३० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत स्नेहदीप कॉलोनी डब्ल्यु.सी.एल.रोड जरीपटका येथे राहणारे योगेश गजानन अच्छेवार वय ३२ वर्ष यांनी आपले राहते घरी अज्ञात कारणावरून टिनाचे छताचे लोखंडी पाईपला दुपट्टयाचे साहय्याने गळफास घेतलेले स्थितीत दिसुन आल्यानें नातेवाईकांनी त्यास खालील उतरवुन उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता तेथे डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. टेकाडे ८३९०९८८३२८ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्रं. व कलम मधील खालील नमुद आरोपी हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. आरोपींनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ क्र | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्यायादंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०२०२५७ /१९९४ | २९४, ५०६(ब), भा.दं.वी | थॉमस मरीयम जोसेफ रा. जयभिम नगर, अजनी, नागपुर | **०१.०६.२०२३** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | मा. अति. मुख्य न्यायादंडाधिकारी साहेब, नागपुर | १९९/१९८४ | ३९४ भा.दं.वी | ईश्वर उर्फे ईशा रामकिसन सेलोकर रा. न्यु, कैलाश नगर अजनी, नागपुर | **०१.०६.२०२३** |

**(अंकुश राठोड)**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर.**